**पंतप्रधानांची कुवेत भेट (21-22 डिसेंबर 2024)**

18 डिसेंबर 2024

कुवेतचे अमीर, महामहिम शेख मिशाल अल-अहमद अल-जबर अल-सबा यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी 21-22 डिसेंबर 2024 रोजी कुवेतला भेट देतील. गेल्या 43 वर्षांतील भारतीय पंतप्रधानांची ही पहिलीच कुवेत भेट असेल.

2. भेटीदरम्यान पंतप्रधान कुवेतच्या नेत्यांशी चर्चा करतील. पंतप्रधान हे कुवेत स्थित भारतीय समुदायाशी देखील संवाद साधतील.

3. भारत आणि कुवेत यांच्यात पारंपारिकपणे निकटचे आणि मैत्रीपूर्ण संबंध आहेत. ज्याची पाळेमुळे इतिहासात रुजलेली आहे आणि त्यांना आर्थिक आणि दोन राष्ट्रांतील नागरिकांच्या मजबूत परस्पर संबंधांचा आधार आहे. भारत हा कुवेतच्या प्रमुख व्यापारी भागीदारांपैकी एक आहे. कुवेत मध्ये अन्य राष्ट्रीयांच्या तुलनेत भारतीयांची संख्या सर्वाधिक आहे.

4. या भेटीमुळे भारत आणि कुवेतमधील बहुआयामी संबंध अधिक दृढ करण्याची संधी मिळेल.

**नवी दिल्ली**

**18 डिसेंबर 2024**